# जुने कर आकारनीनुसार मालमत्ताट कर वसुली सुरु

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** - महानगरपालिका क्षेत्रातील वर्ष 2024 मध्यो नवीन वाढीव कर आकारणी व वसुलीला शासनाकडून स्थगिती मिळाल्यानंतर जुन्याबच पध्द ?तीने कर लागू करण्यायत आला आहे. आता शहरातील मालमत्ता) धारकांना जुन्या. दरानुसार कर आकारणी करुन सुधारीत बिले पाठविण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. नव्या आदेशानुसार आता जुन्याच दराने मालमत्ता कर आकारणी आणि वसुली केली जाईल. ज्यांनी यापूर्वी कराचा भरणा केला, अशांची रक्कम चालू वर्षाचे कराचे मागणी व आगाऊ रक्कम म्हूणून गृहीत धरण्यालत येत आहे. ज्यांनी कर भरला नाही, अशांना दुरुस्ती करून जुन्याच पद्धतीने कराची देयके राहणार आहे. शहरवासीयांना सुविधेसाठी आपला मालमत्ताव कर ऑनलाईन भरण्याची व्यावस्थान सुरु केली आहे. फोन पे, गुगल पे, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, बॅकींगचे घरबसल्याद भरता येईल तसेच कर भरण्याी पावतीवर क्यूधआर कोड टाकण्यीत आले असून https://amravatimc.in या वेबसाईटवर सुविधा उपलब्ध आहे.

# आता थांबणे नाहीच, मी पुर्णपणे तयार आहे!



## हातात मशाल मिळणार आणि विरोधकांना गारद करणार | शिवसेना जिल्हाप्रमूख सुनिल खराटेंनी फुंकले रणशिंग | दै. महासागर ला दिली विशेष मुलाखत

**रोहित गासे**

*अमरावती,( दि.19 )- विधानसभा निवडणूक लढवायची माझ्या डोक्यात नसताना मला बडनेरा मतदार संघाची उमेदवारी देवू केली होती, परंतू तेव्हा माझी तयारी नव्हती. त्यानंतर गेले अनेक वर्ष तयारी केली. माझ्या आयुष्यातील अख्खं एक तप आजच्या दिवसासाठी मी समाजकारण व राजकारणात गमावलं आहे. त्यामूळे आता थांबणे नाहीच, मी निवडणूक लढण्याकरिता पुर्णपणे तयार आहे. मला विश्वास आहे, शिवसेनेकडून मला उमेदवारीही मिळणार, प्रचाराचे नारळ ही फोडणार, अन विरोधकांना गारद करणार, असे म्हणत शिवसेनेचे( उबाठा ) जिल्हाप्रमूख सुनिल खराटे यांनी निवडणूकीचे रणशिंग फुंकले आहे. 'दै.महासागर' ला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्यांनी अनेक प्रश्नाचे उत्तर देत आपली बाजू स्पष्टपणे मांडली.*

**प्रश्न-शिवसेनेची उमेदवारी मिळण्याकरिता प्रिती बंड ही प्रयत्न करित आहे ?**

**खराटे-** माजी आमदार संजय बंड जेव्हा जिवंत होते, तेव्हा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे व इतर प्रमुख नेत्यांसमक्ष संजय बंड यांनी जाहीर केले होते की, बडनेरा मतदारसंघात सुनिल खराटे यांनी लढावे मी त्यांना पुर्ण मदत करेल, आणि तिवसा मतदारसंघात मी स्वत-( संजय बंड) निवडणूक लढवेल. त्यांनी मला बडनेरा मतदार संघाची बांधणी करायला सहकार्य करणेही सुरु केले होते. त्यानंतर दुर्दैवाने त्यांचे अकाली निधन झाले, मी बडनेरा मतदार संघात पक्षाची बांधणी सुरुच ठेवली. जेव्हा 2019 मध्ये निवडणूक तोंडावर आली, तेव्हा प्रिती बंड उमेदवारीसाठी पुढे आल्या. मी त्यांना तिवसा मतदारसंघाचा पर्याय दिला होता, त्यांनी माझे ऐकले नाही आणि बडनेरा मतदारसंघाची उमेदवारी मिळविली. तरी मी त्यांचे काम करायला तयार झालो, परंतू त्यांनी माझ्यावर विश्वास टाकला नाही. जिल्हाप्रमूख असतानाही मला हीन वागणूक दिली. मी सर्व पचवून शिवसेना जिल्हाप्रमूख म्हणून काम केले. काही ठिकाणी त्यांचे नियोजन चुकले आणि पराभव झाला. त्यानंतर त्यांनी बडनेरा मतदारसंघात आपला जनसंपर्क वाढविणे गरजेचे होते, परंतू तसे झाले नाही. मी मतदारसंघात बांधणी करित राहीलो. साडेचार वर्षांनी अचानक त्या आता पुन्हा उगवल्या आणि उमेदवारीसाठी स्पर्धा करित आहे, आम्ही आमचे आयुष्य इतरांसाठी मैदान बनविण्यातच गमवायचे काय ? हा प्रश्न आहे. हा सर्व प्रकार वरिष्ठांनाही माहिती आहे. त्यामूळे आता थांबणे नाहीच, मी माझी पुर्ण तयारी केली आहे. फक्त उमेदवारी मिळण्याची वाट आहे, आणि मला उमेदवारी मिळणार असा दांडगा विश्वासही आहे.

**प्रश्न-जर तुम्हाला उमेदवारी मिळाली नाही तर पुढे काय ?**

**खराटे** - मला उमेदवारी मिळण्यामध्ये जर, तर, किंतु, परंतु वाटत नाही. एखाद्या मल्लाने कुस्तीच्या स्पर्धेकरिता आखाड्यात जावून प्रचंड व्यायाम करायचा, खूप शरिर सौष्ठव मिळवायचे आणि त्याला कुस्तीच खेळू देवू नये. हा तर त्या पहेलवानाचे करिअर संपविण्याचा प्रकार राहील. तो पहेलवान आपली ताकद कोठे ना कोठे काढेलच, यात दुमत नसावे. एखाद्या कुटूंबाला पक्षाकडून वारंवार उमेदवारी मिळत आहे. परंतू पराभवच हाती येत असेल तर पक्ष निश्चित आता त्यांना पुन्हा उमेदवारी देण्याकरिता विचार करेल. त्यांना 'दैवाने दिले, परंतू त्यांच्या कर्माने ते हिरावून नेले', आता आमचे नशीब आजमाविण्याची वेळ आहे, त्यामूळे सर्वांनी आमच्या पाठीशी उभे रहावे.

**प्रश्न-निवडणूकीला घेवून तुमची तयारी काय आहे ?**

**खराटे** - मी गेल्या पाच वर्षांपासून शिवसेनेची बुथस्तरावर बांधणी केली आहे. 60 गावांमध्ये आरोग्य शिबीर घेतले. मी प्रत्येक मतदारासाठी अहोरात्र धावून जातो, त्यामूळे 'सुनिल खराटे' हे नाव गावागावात पोहोचले आहे. निवडणूकीकरिता प्रचार वाहने, सभा स्थळे, बॅनर, प्रचार बुथची व्यवस्था, लागणाऱ्या सर्व परवानग्या आणि त्याला लागणारे कागदपत्र गोळा करुन झाले आहे. एका उमेदवाराला निवडणूक लढण्याकरिता जे आवश्यक असते, ती सर्व तयारी माझी झाली आहे.

**प्रश्न-उबाठा शिवसेनेमध्ये शिंदेसेना अडसर ठरणार का ?**

**खराटे** - बडनेरा विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा गड आहे. प्रदीप वडनेरे, ज्ञानेश्वर धाने पाटील असे नेते येथून दोन-दोन वेळा आमदार झाले आहे. या मतदारसंघात शिंदे सेनेचे अस्तित्व नाही, काही पदाधिकारी आहेत, परंतू राजकारणात ते नवखे आहे. त्यामूळे शिंदे सेना आम्हाला अडसर ठरणार नाही.

**प्रश्न-कोणते मुद्दे घेवून निवडणूकीला सामोरे जाल ?**

**खराटे** - बडनेरा विकासाच्या दृष्टीने प्रचंड मागासलेला आहे, येथील आरोग्य व्यवस्था मजबूत नाही, एमआयडीसी आहे, पण रोजगार नाही. बेरोजगाराला सन्मानाने जगायचे असेल तर त्याच्या हाताला रोजगार हवा, तो रोजगार देण्यासाठी मी कटीबध्द राहील. किराणा वाटून महिलांचा अपमान केल्यापेक्षा महिलांच्या हाताला रोजगार कसा देता येईल, याची योजना आखली जाईल. येथील शिक्षण व्यवस्था मजबूत करण्यावर भर राहील. भविष्यात महापालिकेच्या शाळेत ॲडमिशन करण्याकरिता पालकांची रांग मला पहायची आहे. शहरात वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावण्याकरिता योग्य पाऊल उचलले जाईल. महापालिकेतील खाबुगिरी आणि बाबुगिरीचा चेहरा बदलायचा आहे.2016 पासून येथे आयएएस कॅडरचा आयुक्त नव्हता, मी भांडलो आणि यश मिळविले. अवाजवी टॅक्सविरोधात भांडलो, मतदारसंघात रस्त्यांची दयनिय अवस्था आहे. त्यात सुधारणा करायची आहे. असे अनेक विकासाचे मुद्दे घेवूनच मी निवडणूक लढवित आहे. उमेदवारी मिळताच सर्वांना एकसंघ बांधून दिवंगत माजी आ.संजय बंड यांच्या पराजयाचा बदला घेईल, याकरिता सर्वांनी माझ्या पाठीशी उभे रहावे ऐवढीच अपेक्षा आहे.

# निर्जनस्थळी मद्यप्राशन करणाऱ्यांवर होणार कारवाई

## ट्रिपल सीट चालकांची वाहने करणार जप्त

**शहर पोलिस आयुक्तांची माहिती**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 )-** शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी आता ट्रिपल सीट वाहन दिसल्यास ते तीन महिन्यांसाठी जप्त करण्यात येणार आहे. तसेच घटनास्थळी वाहन जप्त न केल्यास चालकाच्या घरातून ते वाहन जप्त करण्यात येईल, असे पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शनिवारी सांगितले.

शहरातील अनेक तरुण खुलेआम ट्रिपल सीट वाहने चालवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करत आहेत. यासोबतच कर्कश कर्णकर्कश हॉर्न आणि बुलेटमधील फटाक्यांचा आवाज असलेली अनेक वाहने वाहन चालवताना नागरिकांना त्रास देतात. त्यामुळे वाहनचालकांचे लक्ष विचलित होते. यासोबतच वाहतूक विभागाने कारवाई करूनही ट्रिपल सीट चालक हे मान्य करत नाहीत, त्यामुळे आता कोणी ट्रिपल सीट दुचाकी चालवताना दिसल्यास घरातूनच वाहन जप्त करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सांगितले.

शहरातील अनेक भागात मद्यपी वाईन शॉपमधून दारू विकत घेतात आणि निर्जन ठिकाणी बसून सेवन करतात. याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी शुक्रवारी रात्री अनेक निर्जनस्थळी कारवाई करून दारू पिणाऱ्यांना इशारा दिला. शहरातील दशहरा मैदान, सायन्स स्कोअर मैदान, जवाहर मैदान, ऑक्सिजन पार्क, गोपाल नगर या क्रीडांगणांमध्ये सर्रास अनेक मद्यपी येथे येऊन दारू पितात. अशा परिस्थितीत आता पोलीस विभाग या मैनावरही गस्त वाढवून कारवाई करणार असल्याची माहितीही सीपींनी यावेळी दिली

## स्वाधार योजनेत 31 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**अमरावती -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी सन 2024-25 या वर्षासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेत आता अर्ज करण्यासाठी दि. 31 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील अकरावी व बारावीतील पात्र विद्यार्थ्यांना अर्जासोबत आवश्यक कागदपत्राच्या सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामध्ये दि. 31 नोव्हेंबर 2024 पर्यंत अर्ज सादर करावे लागतील. याबाबत अधिक माहितीसाठी सहायक आयक्त समाज कल्याण, सामाजिक न्याय भवन, चांदूररेल्वे रोड, सी. पी. ऑफीसच्या मागे, अमरावती, ई-मेल speld swo_amt@rediffmail.com तसेच दुरध्वनी क्र. 0721-2661261 यावर संपर्क साधावा.

# वीज कोसळली, जिल्ह्यात दोन ठार

## पाच महिला जखमी | तीन म्हशींसह 12 शेळ्या ठार

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी/तिवसा ( दि.19 )** - शनिवारी दुपारी अमरावती जिल्ह्यात वीज कोसळून दोन व्यक्ती ठार, झाले व पाच महिला जखमी झाल्या आहेत. शिवाय तीन म्हशी, 12 शेळ्याचाही मृत्यू झाला.

जिल्ह्यात शनिवारी पहाटे 4 वाजता व दुपारी 4 नंतर विजेच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. चिखलदरा शहरातील अप्पर प्लेटो स्थित प्रोस्पेक्ट पॉईंट जवळ शनिवारी सायंकाळी चार वाजताच्या दरम्यान वीज कोसळून म्हशी चारत असताना तीन म्हशींसह पशुपालक ठार झाला, तर अन्य घटनेत वीज कोसळून 12 शेळ्यांचा मृत्यू झाला व यात




गुराखी जखमी झाल्याची माहिती आहे. गुलाब लक्ष्मण खडके (65, रा. पाढरी) असे मृताचे नाव आहे. दुसऱ्या घटनेत शनिवारी सायंकाळी तिवसा तालुक्यातील इसापूर येथे गणेश ठाकरे यांच्या शेतातून सोयाबीन मळणीचे काम करुन परत येत असतांना वीज पडून ओजाराम अमरलाल मसराम ( 35, रामनगर, मध्यप्रदेश) हा युवक जागीच ठार झाला, तर सोबत असलेल्या नीलम लालसिंग धुर्वे (18), सुनीता सुजाण धुर्वे (38), संगीता संजय मसराम (17), रमाबाई येनुज सरपाण (18), पूनम सुजाण घुर्वे (10) जखमी झाल्या आहेत. जखमींवर तिवसा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

## गुरुकुंज मोझरीत मंडप कोसळला

गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव सुरू आहे. महोत्सव परिसरात वादळासह पावसाने मंडप कोसळला. शिवाय या पावसाने कापूस भिजला व सोयाबीनच्या गंजी पावसाने भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

# मध्यप्रदेश-महाराष्ट्र सिमेवर 14 ठिकाणी चेकपोस्ट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )** - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचार संहिता लागु करण्यात आलेली आहे. सदरची निवडणुक ही निष्पक्ष, पारदर्शी व शांतीपुर्ण वातावरणामध्ये होण्याकरीता तसेच अवैध दारू, शस्त्रे, रोख रक्कम आणि इतर बाबींची तस्करी रोखण्यासाठी अमरावती ग्रमीण घटकाव्दारे मध्यप्रदेश - महाराष्ट्र राज्याचे सिमेवर तसेच आंतर जिल्हा अशा एकुण 14 ठिकाणी चेकपोस्ट लावण्यात आले आहे.



यामध्ये भोकरबर्डी, रंगुबेली, काटकुंभ, बहीरम, रेडवा, रवाडा, पुसल्याचा समावेश आहे. आंतरराज्य तपासणी नाके तसेच खडका, कौंडण्यपुर, देवगाव, शिंगणापुर, नागझिरी, कारला, टाकळी या 7 ठिकाणी आंतरजिल्हा चेकपोस्ट अशा एकुण 14 ठिकाणी चेकपोस्ट नेमण्यात येणार आहे. या चेक पोस्टवर ग्रामीण भागातुन येणार्या वाहनांना 24 तास परवानगी असेल, अशी माहिती ग्रामिण पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून कळविण्यात आली आहे.

## दर्यापूर वसतिगृहात विपश्यना शिबीर

**अमरावती** - सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे आणि दर्यापूर येथील 125वी जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात एक दिवसीय विपश्यना शिबीर पार पडले. वसतिगृहाचे गृहपाल रितेश यादव आणि वनिता गोळे यांनी एक दिवसीय, आनापान व विपश्यना ध्यान साधन शिबीर घेतले. सहायक आचार्य राजेंद्र चांडक, मंगला चांडक, बाल शिबीर शिक्षक श्रेयससिंग ठाकूर यांनी दैनंदिन जीवनात आनापानाचे महत्त्व सांगून प्रशिक्षण दिले.

# ट्रकच्या धडकेत वृध्दाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.19 )** - शासकीय धान्य घेऊन येणाऱ्या ट्रकच्या धडकेत एका वयोवृद्ध व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना 19 ऑक्टोबर रोजी दुपारी 12 वाजताचे दरम्यान पोलीस स्टेशन ते अप्पर वर्धा वसाहत रोडवर घडली. माणिकराव चंपतराव राऊत (85, रा. नेरपिंगलाई, ता. मोर्शी,जि.अमरावती) असे मृतक इसमाचे नाव आहे.

पोलीस सूत्रानुसार अमरावती (बडनेरा) येथून शासकीय धान्य घेऊन येणारा ट्रक क्र.एम एच वाय 6911 मोर्शी येथील अप्पर वर्धा वसाहत जवळ असलेल्या गोडाऊनमध्ये माल उतरवण्यासाठी जात होता. दरम्यान नेरपिंगळाई येथील



माणिकराव चंपतराव राऊत हे वृद्ध काही कामानिमित्त मोर्शी येथे आले होते. ते ऑटोमधून उतरून पायदळ जात असतांना ट्रकची त्यांना जोरदार धडक बसली व ते रक्ताच्या थारोळ्यात खाली पडले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या तानाजी युवा बहुउद्देशीय संस्था आणि टायगर ग्रुपच्या पदाधिकार्यांनी घटनास्थळी धाव घेऊन मोर्शी पोलीसांच्या सहकार्याने जखमी वृद्धाला त्वरित उपजिल्हा रुग्णालय नेले. तेथे शवविच्छेदन झाल्यानंतर, पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी ट्रक चालक शेख जावेद शेख कदीर (33, रा.पारडी) यांना ताब्यात घेतले. ठाणेदार नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला आहे. या मदत कार्यात तानाजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल दिलीपराव पंडागरे, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे पोलीस उपनिरीक्षक रणखांब, पोलिस हवालदार संदीप वंजारी तसेच आकाश कुमरे (टायगर ग्रुप मोर्शी तालुका), आकाश चांदे,मयूर राऊत यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजुला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# धक्कादायक : संपत्तीसाठी काकाने पुतण्याला संपविले

## झोपीतच केले ठार | पाच आरोपींना अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** – खोलापुर हद्दीतील धामोरी बस स्टॅन्ड स्थित अमरावती ते दर्यापुर मार्गावर 18 ऑक्टोंबर रोजी अजय रविकिरण मुंगाने (23, रा. धामोरी) याचा मृतदेह आढळून आला होता. याप्रकरणात पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून चौकशी केली असता, अज्ञात आरोपींनी अजयची हत्या करून मृतदेह रस्त्यावर फेकुन अपघाताचा बनाव केल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा व खोलापुर पोलिसांनी तपासाची चक्रे जलदगतीने फिरवत या हत्येच्या गुन्ह्यात आशिष शैलेशसिंग मुंगाने (23), जयश्री शैलेशसिंग मुंगाने (43), पायल आशिश मुंगाने (24) व बाळकृष्ण महादेव खरबडे (43,सर्व रा.धामोरी) व जोत्सना नारायणसिंग शेंगर (42,



रा. नरखेड, जि. नागपुर) यांना अटक करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

पोलिस सुत्रानुसार, अजय मुंगानेचा मृतदेह आढळून आल्यानंतर अपर पोलीस अधिक्षक पंकजकुमार कुमावत, उप-विभागीय पोलीस अधिकारी अशोक थोरात, खोलापुर व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. घटनास्थळाची प्रथमदर्शनी पाहणी केली असता मृतदेह हा ज्या ठिकाणी पडुन होता, तेथे शेजारीच मृतकाचे हॉटेल होते. मृतक रात्री त्या ठिकाणी झोपत होता, अशी माहीती प्राप्त झाली. त्यामुळे पोलिसांनी सदर हॉटेलची पाहणी केली असता त्या ठिकाणी रक्ताचे डाग दिसुन आले. त्याचप्रमाणे मृतकाचे डोक्यावर एखाद्या वजनदार व धारदार वस्तुने मारहाण केल्यामुळे त्याचा मृत्यु झाल्याचे मृतदेहाच्या पाहणी केल्यावर स्पष्ट झाले होते.

त्यामुळे या घटनेचे गांभिर्य पाहता हा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी आदेशीत केले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व खोलापूर पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस करून, आरोपींना अटक केली.

### जमिन व 10 लाखवांचा विमा रक्कमेसाठी घेतला जीव

अजय याच्या आई-वडिलांचे निधन झाले होते. त्यामुळे तो सावत्र काका आशिष याच्या धामोरी येथील घरी गेल्या 14 वर्षापासुन राहत होता. अजय मुंगाने याच्या नावाने वडीलोपार्जीत जमीन तसेच 10 लक्ष रूपयांचा विमा होता. त्यामुळे अजयला ठार मारल्यास त्याची जमिन व विम्याची रक्कम मिळेल या लालचेपोटी आशिषने त्याच्या गावातील बाळकृष्ण महादेव खरबडे तसेच त्याचे नातेवाईक जोत्सना नारायणसिंग शेंगर यांना प्रत्येकी 2 लक्ष रक्कम देण्याचे सांगून कटात सामिल करून घेतले. त्यानंतर घटनेचे दिवशी आशिष यांची आई व पत्नी हे घरावर उभे राहुन पोलीस किंवा इतर वाहनांची निगराणी करित होते. दरम्यान आशिष, बाळकृष्ण व ज्योत्सना यांनी अजय झोपीत असतांना त्याचे हात-पाय पकडले आणि त्याच्या डोक्यावर फरशीच्या तुकडया जबर प्रहार करून त्याला ठार मारले. त्यानंतर त्यांनी अपघाताचा बनाव करण्यासाठी अजयचा मृतदेह रोडवर टाकुन दिला आणि हॉटेलला रात्रीच पाण्याने धुवून काढले. याबाबत आरोपींनी कबुली दिली. पुढील तपास खोलापुर पोलीस करित आहेत.

# अचलपूर मतदारसंघात वाढले 10257 मतदार

## आचार संहीतेचा भंग होवू नये याकरिता पथके तयार

**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर/परतवाडा, ( दि.19 )**- अचलपूर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक पुर्व नियोजन प्रक्रिया पुर्ण झाली असून यंदा 10257 ने मतदार वाढले आहेत. अचलपूर मतदार संघात चांदुर बाजार तालुक्यातील मतदार समाविष्ट असुन एकुण मतदार संख्या 2,91074 असून यात पुरुष 148499 तर महीला 142570 आहे तर दीव्यांग मतदार 1925 असून 85 वर्षांवरील मतदार 4334 एवढे आहे. अशी माहीती अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी एका पत्रकार परिषदेतून दिली.



त्यांनी निवडणूकीच्या तयारीची माहिती देत पुढे सांगितले की, अवैध दारू,पैसा,व इतर बाबींसाठी अचलपुर मतदारसंघात तपासणी नाकेही तयार करण्यात आले असून मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवरही कडक तपासणी होत आहे यात महसूल, पोलीस,परीवहन आरटीओ अधीकारी कर्मचारीचा समावेश आहे.

तर मतदारसंघातील प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी,शेड,प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात येणार आहे तर मतदान केंद्रावर मोबाईल चा वापर फोटो काढणे यावरही अंकुश ठेवला जाणार आहे.तर मोर्चा, रॅली, पोस्टर, परवानगी, आंचार सहींता, यासाठी पथके तयार करण्यात आली आहेत.निवडणुक प्रक्रिया नामांकन दी.22 आक्टोबर ते 29 पर्यंत राहणार असून 30 आक्टो. राज अर्जाची छाननी करण्यात येणार आहे तर 4 आक्टोबर उमेदवारी अर्ज मागे घेता येईल तर 20 आक्टोबर ला मतदान होणार असून 23 आक्टोबर रोजी कल्याण मंडपम सभागृहात अचलपूर य विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होणार आहे, यंदा निवडणुकीत मतदान जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून मतदानाचा टक्का जास्तीत जास्त होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे हे असेही अरखराव म्हणाले, यावेळी नायब तहसीलदार अक्षय मांडवे उपस्थीत होते.



**अमरावती**- येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दिनांक 16 ऑक्टोबर 2024 रोजी पायल सैनी, रा. सिकर, राजस्थान यांनी या महाविद्यालयातील पहिला प्रवेश नोंदविला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले यांनी त्यांना प्रवेशपत्र देऊन स्वागत केले.

# दर्यापूर बाजार समिती वार्डात होणार मतमोजणी

### दिव्यांगाना मतदान कक्षात थेट प्रवेश राहणार

### 342 मतदान केंद्र

### दर्यापूर निवडणूक विभागाची पत्रकार परिषद



**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.19 )** – आगामी विधानसभा निवडणूकीसाठी करण्यात आलेल्या तयारीचा आलेख उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एका पत्रकार परिषदेतून मांडला.

त्यांनी सांगितले की, मतदान केंद्राची अद्यावत व्यवस्था करण्यात आली आहे. याकरिता तब्बल 1528 कर्मचाऱ्यांना विविध कार्य सोपविण्यात आले आहे. यासह उमेदवारी अर्ज स्विकारण्यासाठी एक खिडकी योजना करण्यात आली आहे, अर्ज स्विकारण्याचे ठिकाण नवीन तहसील कर्यालय अमरावती रोड या ठिकाणी देण्यात आले आहे. तसेच मतमोजणी दर्यापूर बाजार समितीत होणार असून व्यवस्थेवर निवडणूक विभाग नजर ठेऊन आहे.

40 दर्यापूर अंजनगाव विधानसभा मतदार संघा बाबत तालुका निहाय माहिती देण्यात आली त्यामध्ये दर्यापूर अंजनगाव तालुक्यातील गावांतील 342 केंद्र देण्यात आले आहेत. मतदार लोकसंख्या 431031 असून 1067 दिव्यांग आहेत तर तृतीय पंथी मतदार संख्या 03 आहे

तसेच मतदार संख्या अंतिम झाल्यानंतर काही प्रमाणात वाढतील, सर्विस वोटर सैनिक क्षेत्रातील कर्मचारी, 85 वर्षे वयांचे व्यक्ती, दिव्यांग मतदार इत्यादी माहिती देण्यात आली. दर्यापूर तालुक्यात 170 मतदान केंद्र असून अंजनगाव तालुक्यात 140 मतदान केंद्र आहेत, लगतच्या अचलपूर तालुक्यात दर्यापूर मतदार संघातील काही गावे असून त्याकरिता 32 मतदान केंद्र निर्माण करण्यात आले आहेत.

मतदार संघात एकूण 16 महसूल मंडळे असून आठ पोलीस स्टेशन आहेत, राखीव सुरक्षा कक्ष नवीन तहसील कार्यालय दर्यापूर येथे ठेवण्यात आले आहे तर मतमोजणी करता कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर परिसरातील गोदाम परिसरात सुरक्षा कक्ष देण्यात आला आहे. मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांकरिता प्रथम व द्वितीय प्रशिक्षण या ठिकाणी ठेवण्यात आले आहे. दर्यापूर तहसील कार्यालयामध्ये एक खिडकी योजना व्यवस्था करण्यात आली आहे , सर्व प्रकारचे वाहन प्रचार सभा रॅली करिता परवानगी देण्यात येणार आहे. यासाठी लागणारे संमती पत्र, जागा मालक, वाहन मालक, चालक यांची आवश्यक कागदपत्रे रॅली काढण्यासाठी पोलीस विभागाकडून परवानगी आवश्यक आहे. दिव्यांग मतदारासाठी विशेष व्यवस्था करण्यात आले आहेत तसेच शौचालय पिण्याचे पाण्याची व्यवस्था याबद्दल ही मतदान केंद्रावर व्यवस्था करण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी एस. डी. ओ. राजेश्वर हांडे यांच्या अध्यक्षतेखाली दर्यापूर तहसील कार्यालय निवडणूक सभागृहात ही पत्रकार परिषद घेण्यात आली.यावेळी तहसीलदार डॉ. रवींद्र कानडे उपस्थित होते.

# ऐतिहासिक ठरले विनोदवीराचे फव्वारे अन् बच्चु कडूंची मुलाखत

### अचलपूर नगरीतील राजकारण तापले

- अभिनेत्री सई ताम्हणकरसह महाराष्ट्राची हास्यजत्रेने केली धमाल
- पुरुषांच्या महिलांच्या लक्षणीय गर्दीने फुलला गांधीपूल परिसर





**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.19 )** – अवघ्या महाराष्ट्राला विनोदाची भुरळ घालणाऱ्या महाराष्ट्राच्या हास्यजत्रेतील विनोदवीरांनी अचलपूर नगरीत शुक्रवारी दमदार बॅटिंग केली.सिने अभिनेत्री सई ताम्हणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्राची हास्यजत्रा मधील दिग्गज कलाकारांनी उपस्थिती दर्शविली होती. अभिनेते डॉ. निलेश साबळे यांच्या हास्यांच्या फवाऱ्यांनी तसेच सूत्रसंचालनाने अचलपूरवासी मंत्रमुग्ध झाले होते.डॉ. निलेश साबळे यांनी घेतलेल्या आ. बच्चू कडू यांच्या धडाकेबाज मुलाखतीने ऐन दिवाळीपूर्वी राजकारणात फटाके फुटायला लागलेत. शुक्रवारी गांधीपूल परिसर प्रचंड गर्दीनेफुलला होता.विशेष म्हणजे महिलावर्गाची लक्षणीय उपस्थिती विरोधकांना धडकी भरणारी होती.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वारे वाहू लागले आहेत अश्यातच आ. बच्चू कडू यांनी अचलपूर मतदार संघात केलेल्या 1600 कोटी रुपयांची कामे केल्याबद्दल प्रहार पक्ष व नागरिकांच्या वतीने आ. बच्चू कडू यांचे आभार व्यक्त करण्यासाठी शुक्रवारी गांधीपूल येथे महाराष्ट्राची हास्यजत्रा व विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध सिने अभिनेत्री सई ताम्हणकर यांची उपस्थिती अचलपूरवासीयांना भुरळ घालणारी होती. अभिनेते डॉ.निलेश साबळे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शिवाय भाऊ कदम,पृथ्वीक प्रताप, शिवाली परब, सुपर्णा शाम यांनी विनोदाचे विविध प्रयोग सादर करून अचलपूर वासीयांना अगदी लोटपोट केले.महाराष्ट्रातील प्रेक्षकांना टीव्ही समोर खिळवून ठेवणाऱ्या महाराष्ट्राच्या हास्यजत्रेने आजवर मोठ्या शहरातच लाईव्ह कार्यक्रमांचे आयोजन केले. मात्र पहिल्यांदा अमरावती जिल्ह्यात आणि त्यातही अचलपूर सारख्या ठिकाणी या कार्यक्रमाचे खास आयोजन करण्यात आल्याने अचलपूर मतदार संघातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा आवर्जून उपस्थिती दर्शविली होती.

शाहीर राजेंद्र कांबळे यांनी आ. बच्चू कडू यांच्या कार्याला समर्पित पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डॉ. निलेश साबळे यांनी आ. बच्चू कडू यांची घेतलेली धडाकेबाज मुलाखत महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देणारी तसेच दिवाळीपूर्वीच फटाके फोडणारी होती. निलेश साबळे यांनी विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला बच्चू कडू यांनी त्यांच्या शैलीत दिलेले उत्तर उपस्थितांना आश्वासक ठरणारे होते. आ. बच्चू कडू यांनी महाराष्ट्रातील हास्यजत्रा मधील सर्व कलाकारांचा सत्कार केला यावेळी महिला वर्गाने सुद्धा विविध खेळ व कलेमध्ये सादरीकरण केले.यावेळी सई ताम्हणकर व निलेश साबळे यांनी पैठणी देऊन महिलांचा यथोचित सन्मान केला.

अचलपूर मतदार संघात आ. बच्चू कडू यांनी विकासाची गंगा खेचून आणल्याने नागरिकांच्या वतीने आ.बच्चू कडू यांचे आभार व्यक्त करण्यात आले.यावेळी काँग्रेस, युवा स्वाभिमान पक्षातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी प्रहार पक्षात प्रवेश केला. आ. बच्चू कडू यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे पक्षात स्वागत करून त्यांचा सन्मान केला.

# श्रेयस पोटे प्रेरणादायी, कर्तव्यतत्पर व कृतिशील नेतृत्व

आपले अस्तित्व सिद्ध करण्याची क्षमता ज्याच्यामध्ये असते, तेच खरे यशाचे शिलेदार असतात. प्रवीण पोटे यांचे सुपुत्र पी.आर.पोटे पाटील एज्युकेशन ग्रुपचे उपाध्यक्ष श्रेयस पोटे असेच एक प्रामाणिक युवा नेतृत्व म्हणून उभरले आहे. समोरच्यासोबत केवळ हसून आणि दोन शब्द प्रेमाचे बोलून आपलसं करणारे श्रेयस पोटे यांनी शिक्षण क्षेत्रात खुप मोठी भरारी घेतली आहे. आज श्रेयस पोटे यांनी शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पि.आर.पोटे ग्रुप या संस्थेची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत संस्थेचे नाव जगभर करण्यात श्रेयाचा वाटा श्रेयस पोटे यांचा आहे. ते पी आर पोटे पाटील एज्युकेशन ग्रुपचे उपाध्यक्ष झाल्यापासून संस्थेने विविध क्षेत्रात भरारी घेतली. प्रत्येक गोष्टीचे त्यांचे सुक्ष्म नियोजन इतरांना शिकण्यासारखे आहे. मुंबई, दिल्ली मेट्रो सिटी नामांकित




संस्थेच्या सुविधा आपण अमरावतीकरांना उपलब्ध करून दिल्या आहे. त्यांच्या कल्पक वृत्तीमुळे पी.आर.पोटे एज्युकेशन ग्रुप जगात भरारी घेत आहे. शिक्षक व विद्यार्थी यांचा संस्थेबद्दल विषय अगदी अतुट आणि जिव्हाळ्याचा आहे. जीवनाच्या प्रवासात अनेक तत्वे असणारी आणि तत्वांशी प्रामाणिक असणारी माणसे या जगात कमीच असतात. अतिशय शांत स्वभाव असणाऱ्यापैकी, मनासारखी नव्हे तर मन समजून घेणारी माणसे फार कमी असतात. अशा माणसांपैकीच एक म्हणजेच श्रेयस पोटे आहेत! जीवनाच्या प्रवासात अनेक लोकांच्या भेटीगाठी होतात. परंतु काही माणसे अशी असतात जे त्यांच्या सुंदर स्वभावामुळे कायमचे स्मरणात राहून जातात. अशा व्यक्तीचे स्थान जीवनात आदराचे असते. आणि या आदरणीय व्यक्तीचे आपल्या जीवनातील महत्व व्यक्त करण्यासाठी त्यांच्या वाढदिवशी उत्तम शुभेच्छा संदेश पाठवून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देणे आपले कर्तव्य असते.असे म्हणतात की दिशादर्शक आणि मार्गदर्शक योग्य असतील तर निर्णय चुकत नाहीत. असेच काहीसे मार्गदर्शन मला आयुष्यात श्रेयस पोटे द्वारे लाभले आहे. एक व्यक्ती म्हणून नाही तर एक व्यक्तिमत्त्व म्हणून आयुष्य जगणाऱ्या माझ्या आयुष्यातील आदराचे स्थान श्रेयस दादांचे आहे. कामासाठी असलेले त्यांचे समर्पण खरोखर प्रशंसनीय आणि प्रेरणादायी आहे. धडाकेबाज कर्तव्यतत्परता, कृतिशील, आक्रमक, निर्णय होईपर्यंत समस्यांचा केला जाणारा पाठपुरावा, नागरी समस्यांचे निराकरण करताना त्यासाठी उपलब्ध करून दिलेले पर्याय, अशा सर्वच पातळीवर त्यांनी आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखविली आहे. आज श्रेयस पोटे यांचा वाढदिवस. त्यांना वाढदिवसानिमित्य हार्दिक शुभेच्छा! आपण सदैव हसत रहावे, आपली प्रकृती उत्तम असावी आणि आपल्याला दीर्घायुष्य लाभो हीच आजच्या दिनी ईश्वरचरणी प्रार्थना!.



**-मोहन देशमुख**
**प्रसिद्धी प्रमुख भा.ज.पा,**
**अमरावती.**


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'दिनेश विश्वनाथ सुलताने' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे, मिळकतीचे वर्णन मौजे तरखेडा, शेत सर्वे क्रं. 31/1, प्लॉट क्रं. 39 पैकी, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'दिनेश विश्वनाथ सुलताने' यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 24/06/2019 रोजीचे दस्त क्र. 2955 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'प्रभुगीर गंगागीर गिरी' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येने प्रमाणे,

मिळकतीचे वर्णन -मौजे-शेंदोळा खू, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 250, जूना घर क्रं. 222, ता.तिवसा, जिल्हा. अमरावती.

चतु: सीमा- पूर्व-सरकारी रस्ता पश्चिम-सरकारी रस्ता,
उत्तर-सुखदेव सावरकर यांचे घर, दक्षिण-सरकारी रस्ता.

सदर मिळकत नामे 'प्रभुगीर गंगागीर गिरी' यांना ग्रामपंच्यायत शेंदोळा खू यांचा तपशीलआणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहेतसेच वरील वर्णनाचीनमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी ÒPIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD.BR AMRAVATI.Ó येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठेगहान /राष्ट्रीयकृत/खाजगी/ पतसंस्था/ सहकारी/ इतरबँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7(सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745